नाशिक परिक्रमा मार्गासाठी भूसंपादन

जिल्हाधिकाऱ्यांची तलाठी, ग्रामसेवकांना प्रक्रियेला चालना देण्याची सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साकारण्यात येणाऱ्या नाशिक परिक्रमा मार्गामुळे (रिंग रोड) जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्यासाठी तलाठी, ग्रामसेवक यांनी पुढाकार घेऊन भूसंपादन प्रक्रियेला चालना द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले.

नाशिक परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनाबाबत संबंधित क्षेत्रातील तलाठी आणि ग्रामसेवक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस जिल्हाधिकारी प्रसाद यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपविभागीय अधिकारी अप्पासाहेब शिंदे (दिंडोरी), तहसीलदार मुकेश कांबळे (दिंडोरी), अपर तहसीलदार अमोल निकम (नाशिक शहर) यांचेसह मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

कुंभमेळ्यात शहरातील विद्यमान वाहतूक सुविधा आणि सार्वजनिक व्यवस्थांवर प्रचंड ताण पडू शकतो. हे लक्षात घेऊन अंतर्गत वाहतूक सुरळीत करण्यासाठी नाशिक शहराभोवती नवीन वळण रस्ता (रिंग रोड) अर्थात परिक्रमा मार्ग तयार करण्यात येणार आहे. नाशिक हे महत्वाचे धार्मिक, औद्योगिक आणि पर्यटन केंद्र असल्याने वाढत्या वाहनांमुळे तीव्र वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागत आहे. तीन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग आणि अनेक राज्यमार्ग नाशिकमधून जात असल्याने रस्ते पायाभूत सुविधांवर ताण येतो. परिक्रमा मार्गामुळे कुंभमेळ्यात वाहतुकीचे व्यवस्थापन होईल. शिवाय, या भागात दीर्घकालीन पायाभूत सुविधांचे लाभ मिळणार आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने परिक्रमा मार्ग अर्थात रिंग रोडसाठी निवडलेल्या संरेखनामुळे प्रस्तावित वाढवण (तवा) - नाशिक द्रुतगती महामार्ग आणि नाशिक-चेन्नई द्रुतगती महामार्ग यांच्याशी आवश्यक दुवे जोडले जाणार आहेत. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी नाशिक परिक्रमा मार्गामुळे सर्वच क्षेत्राच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे सांगितले. त्यातून नाशिक शहराच्या विकासाचे भक्कम वर्तुळ तयार होणार आहे. त्यामुळे तलाठी, ग्रामसेवकांनी आपापल्या भूसंपादन अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून भूसंपादनाच्या कार्यवाहीला गती द्यावी.

तलाठी, ग्रामसेवकांनी प्रत्यक्ष मोजणी प्रक्रियेत सहभाग नोंदवताना जमिनीचा मूळ मालक कोण आहे, याची ओळख पटवावी, थेट खरेदीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे. या प्रकल्पाच्या भूसंपादनाचा शासन नियमानुसार अधिकाधिक मोबदल्याचा लाभ मिळणार असल्याचे शेतकऱ्यांना समजून सांगावे, विरोध केल्याने भाव वाढवून मिळत नाही तर समन्वयातून लवकरात लवकर लाभ देणे शक्य व्हावे, यासाठी सहकार्याची भूमिका घेण्याचे आवाहन करावे. सातबारा उताऱ्यावरील मृत व्यक्तीचे नाव बदलण्यासाठी प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी, पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींनी ग्रामसभेचे ठराव करून घ्यावेत इत्यादी सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

जमीन देण्यास विरोध

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर होणारा नाशिक परिक्रमा मार्ग त्याच्या घोषणेपासून चर्चेत आला आहे. या मार्गात भूसंपादन हा सर्वात मोठा अडथळा आहे. या मार्गासाठी जमीन देण्यास अनेकांचा नकार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी तलाठी, ग्रामसेवक यांची बैठक घेत शेतकऱ्यांना समजावून सांगण्याची सूचना केली.

नाशिकमध्ये आज जैन सांस्कृतिक महोत्सव

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : २०२५ वर्षाला निरोप आणि २०२६ वर्षाचे स्वागत या हेतूने नाशिक जिल्हा जैन सांस्कृतिक कला फाउंडेशनच्या वतीने बुधवारी सायंकाळी सात ते रात्री १२ या वेळेत येथे जैन सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव पंचवटीतील हनुमानवाडी येथील धनदाई लॉन्स येथे होणार आहे.

या कार्यक्रमास संपूर्ण जिल्ह्यातील जैन व माहेश्वरी परिवारांनी उपस्थित राहून मनोरंजन, भक्ती आणि स्नेह भोजनाचा आस्वाद घेऊन नव्या वर्षाचे स्वागत करावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष मोहनलाल लोढा, कार्याध्यक्ष कांतीलाल चोपडा व कार्यकारिणीने केले आहे. सूत्रसंचलन प्रा. लोकेश पारख करणार आहेत. या कार्यक्रमात पुरस्कारही प्रदान केले जाणार आहेत. मुस्कान संस्थान, वासल्यधामचे (डुंगरपूर, राजस्थान) भरत दादा जैन यांना करूणारत्न पुरस्कार, धार्मिक परीक्षा बोर्ड अहिल्यानगरचे विश्वस्त नंदूशेठ भटेवरा कोल्हार यांना समाजभूषण पुरस्कार, जामखेड कोठारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय कोठारी यांना मानवसेवा पुरस्कार, छत्रपती संभाजी नगर श्री संघाचे संघपती मिठालाल कांकरिया यांना जीवन गौरव पुरस्कार, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष मधुकर गांधी यांना समाजरत्न पुरस्कार, वणी मर्चंट को ऑफ बँकेचे अध्यक्ष महेंद्र बोरा यांना शिक्षा सहकार सेवा पुरस्कार आणि डॉ. सुप्रिया गुगळे यांना महिला आरोग्य सेवा पुरस्कार देण्यात येणार आहे प्रसिद्ध उद्योगपती आशिष भन्साली यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास दिनेश राका, नंदलाल शिंगवी, राजेंद्र मंडलेचा, शांतीलाल अलिझाड, आशिष नहार ,निलेश बोरा आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. वैजापूर जिल्हा संभाजीनगर परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य विशाल संचेती यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात येणार आहे.

संक्षिप्त

‘तालाभिषेक बैठक’

नाशिक : येथील पवार तबला अकादमी, रिवाज (मुंबई) आणि अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाऊंडेशनच्या वतीने ‘तालाभिषेक बैठक’ दोन जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आली. कुसुमाग्रज स्मारकातील विशाखा सभागृहात ही मैफल होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून अल्पारंभ परिवारातील श्रीनिवास पत्की, प्रीती पत्की, विश्वेश सुवर्णकार आणि बासरीवादक अनिल कुटे असतील. मैफिलीत अमेरिकेत वास्तव्य असलेले आणि पंडित अनिंदो चॅटर्जी यांचे शिष्य युवा तबलावादक विवेक पंड्या यांचे स्वतंत्र तबलावादन होणार आहे. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी प्रथम स्वतंत्र तबलावादन केले. नुकत्याच पार पडलेल्या लंडन येथील दरबार महोत्सवात आपली कला सादर केली आहे. त्यांना प्रशांत महाबळ (संवादिनी) साथ करतील. मैफिलीच्या उत्तरार्धात मुंबई येथील बासरीवादक एस. आकाश यांचे बासरीवादन होणार आहे. त्यांना विवेक पंड्या (तबला) हे साथ करणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन संस्थेतर्फे करण्यात आले असून प्रवेश सर्वांसाठी खुला आहे . रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पवार तबला अकादमीचे संचालक नितीन पवार, एस. डब्ल्यू. एस. फायनान्शियल सोल्युशन प्रा. लि. चे संचालक रघुवीर अधिकारी यांनी केले आहे.

साहित्यकणा संमेलन अध्यक्षपदी डॉ. तौर

नाशिक : साहित्यकणा फाउंडेशनच्या वतीने एक फेब्रुवारी २०२६ रोजी कॅनडा कॉर्नर येथील समर्थ मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या उद्घाटकपदी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे साहित्यिक आणि भाषा अभ्यासक डॉ. पृथ्वीराज तौर यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष संजय गोराडे यांनी दिली. डॉ. तौर हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मराठी विभागप्रमुख असून भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा सल्लागार समितीवरही त्यांचे कार्य मोलाचे आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव विलास पंचभाई यांनी दिली.

नववर्ष स्वागतासाठी नाशिक सज्ज

नाशिक : सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी नाशिककर सज्ज झाले आहेत. नववर्षाच्या स्वागतानिमित्त रस्त्यांवर होणाऱ्या गर्दीमुळे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी नियोजनावर भर दिला आहे.

नववर्ष स्वागतासाठी शहरात उत्साह शिगेला पोहचला आहे. नववर्ष स्वागतासाठी बऱ्याचदा मांसाहार तसेच मद्यपानाला पसंती देण्यात येते. यंदा ३१ डिसेंबर रोजी एकादशी असल्याने मांसाहार प्रेमींमध्ये काहीशी निराशा आहे. नववर्ष स्वागताच्या उत्साहाला महापालिका निवडणुकीची किनार असल्याने उमेदवारांकडून मतदारांसह कार्यकर्त्यांना मेजवान्या आधीपासूनच दिल्या जात आहेत. एकादशी असल्याने मासांहारी पदार्थांऐवजी उपवासाचे पदार्थ किंवा शाकाहारी पदार्थ यांना पसंती दिली जात आहे. हॉटेल, बारमध्येही ३१ डिसेंबरसाठी नियोजन सुरू आहे. ठिकठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. कॉलनी परिसरातही नागरिकांनी नववर्ष स्वागताची तयारी केली आहे. नागरीकांच्या उत्साहाला येणारे उधाण पाहता पोलीसांनी नियोजनावर भर दिला आहे. मद्य प्राशन करुन वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. ३१ डिसेंबरच्या पूर्वसंध्येला ५२ जणांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलीस सहायक उपायुक्त संदीप मिटके यांनी दिली.

निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर, ३५० जणांना कारणे दाखवा नोटीस

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून गंभीर दखल

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : येत्या १५ जानेवारीला होणाऱ्या मालेगाव महापालिकेच्या निवडणुकीच्या कामासाठी साडेतीन हजार कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांसाठी येथे निवडणूक प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास तब्बल ३५० कर्मचाऱ्यांनी दांडी मारल्याचे निदर्शनास आले आहे. साडेतीन हजारांपैकी चक्क १० टक्के एवढ्या संख्येच्या कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास दांडी मारल्याने मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त रवींद्र जाधव यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी पहिले निवडणूक प्रशिक्षण गेल्या रविवारी पार पडले.

दोन सत्रात हे प्रशिक्षण घेण्यात आले.

येथील मोहन थिएटर व ॲरोमा थिएटर या दोन ठिकाणी मुख्य प्रशिक्षण वर्ग तर ईव्हीएम हाताळणी वर्ग एटीटी हायस्कूल येथे घेण्यात आले.

मोहन थिएटर व ॲरोमा थिएटर या ठिकाणी सकाळ सत्रात १७५० व दुपार सत्रात १७५० अशा नियुक्त करण्यात आलेल्या एकूण साडेतीन हजार कर्मचाऱ्यांसाठी निवडणूक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणास तीन हजार १५० कर्मचारी हजर होते. मात्र ३५० कर्मचारी गैरहजर राहिल्याचे निदर्शनास आले.

या कर्मचाऱ्यांनी महापालिका प्रशासनास कोणतीही पूर्वकल्पना न देता या प्रशिक्षणाला दांडी मारल्याचे आढळून आले. त्यामुळे या प्रकाराची गंभीर दखल घेत महापालिकचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र जाधव यांच्या वतीने सर्व गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात येत आहेत.

संबंधितांचा खुलासा परिस्थितीजन्य व योग्य नसला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा या नोटीसीद्वारे देण्यात आला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे व्यवस्थापन तसेच प्रशिक्षण देण्यासाठी ६० अधिकारी,कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कुंभमेळा प्राधिकरण मराठी साहित्य संमेलनासाठी उत्सुक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाविषयी जनजागृतीसाठी साहित्य, कला, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. तसेच २०२७ मध्ये होणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक येथे होण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पुढील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कुंभमेळा या संकल्पनेवर आयोजित करण्याबाबत चर्चेसाठी आयुक्त सिंह यांनी शहरातील शिक्षण, साहित्य, कला, पत्रकारिता आदी विषयातील तज्ज्ञ यांच्यासमवेत संवाद साधला.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गोविंद कतलाकुटे, साहित्यिक नरेश महाजन, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, बाळासाहेब क्षीरसागर, नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, गिरीश नातू, सावानाचे सुरेश गायधनी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे १२ वर्षांनंतर सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. आगामी कुंभमेळ्याचा कालावधी प्रदीर्घ आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्याचा इतिहास, महत्व, पुराणातील महत्व आणि या माध्यमातून परिसरातील पर्यावरण संवर्धन, गोदावरी नदीचे पावित्र्य, स्वच्छता आणि संवर्धन यावर परिसंवाद, निबंध लेखन, चर्चासत्र आयोजित करण्यासाठी पुढाकार घेण्याचे नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सूचित केले.कुंभमेळ्यातील सामाजिक समरसता, अध्यात्म, आधुनिक जीवन या विषयावर लेखन स्पर्धेचे आयोजन करतानाच कुंभमेळ्यातील कलात्मक पैलू यांचा साहित्य क्षेत्राशी समन्वय साधत विविध उपक्रम राबवावेत, अशी प्राधिकरणाची अपेक्षा आहे.

महाविद्यालयांच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कुंभमेळा संकल्पनेचा समावेश, कुंभमेळा संबंधित साहित्य प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन, कार्यशाळा आदींच्या माध्यमातून कुंभमेळ्याच्या जनजागृतीत सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले.

नाशिकमध्ये तीन साहित्य संमेलने

मराठी सारस्वतांचा कुंभमेळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आतापर्यंत तीनवेळा नाशिकमध्ये आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे १९४२ मध्ये नाशिकमध्ये पहिले साहित्य संमेलन झाले होते. त्या संमेलनाचे अध्यक्ष प्रल्हाद केशव अत्रे होते. त्यानंतर प्रदीर्घ काळाने म्हणजे २००५ मध्ये मविप्र शिक्षणाच्या प्रांगणात दुसरे साहित्य संमेलन झाले. तेव्हा केशव मेश्राम हे संमेलनाचे अध्यक्ष होते. पुढे २०२१ मध्ये तिसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भुजबळ नॉलेज सिटीच्या प्रांगणात पार पडले होते. या संमेलनाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी भूषविले होते. तब्येतीच्या कारणास्तव ते प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नव्हते. प्राधिकरणाच्या आवाहनानुसार आता गोदा काठावर हिंदु धर्मियांचा कुंभमेळा आणि सारस्वतांच्या कुंभमेळ्याचा योग जुळून येणार का, याबद्दल उत्सुकता आहे.

जानोरी शाळा विकासासाठी सहकार्याचे खा. भगरे यांचे आश्वासन

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : जानोरी येथील जिल्हा परिषद शाळेत ‘ज्ञानगंगा एक्स्प्रेस’ नावाची ज्ञानदानाची रेल्वे साकारण्यात आली आहे. ही संकल्पना भविष्यात आणखी विस्तारेल, असा विश्वास व्यक्त करत जानोरी जिल्हा परिषद शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन खासदार भास्कर भगरे यांनी केले.

दिंडोरी तालुक्यातील जानोरी येथे जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोल्यांचा लोकार्पण सोहळा खासदार भगरे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ, शिक्षणाधिकारी सरोज जगताप, गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे, पोलीस निरीक्षक रघुनाथ शेगर, गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण आदी उपस्थित होते.

खासदार भगरे यांनी शाळेच्या विकासाबद्दल समाधान व्यक्त करत एचएएलच्या माध्यमातून शाळेची इमारत पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यापूर्वी जानोरी ग्रामपंचायतीतील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका व बहुउद्देशीय सभागृहाचे लोकार्पण करण्यात आले. प्राथमिक शिक्षणाधिकारी सरोज जगताप यांनी जानोरी शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले. एचएएल कामगार संघटनेचे अध्यक्ष अनिल मंडलिक यांनीही शाळेच्या इमारतीसाठी योगदान देण्याचे आश्वासन दिले.

ओझरचे नगरसेवक प्रमोद कुटे यांनी शाळेला १० घड्याळे भेट दिली. अशोक कदम आणि शिल्पा डेंगळे यांनी तीन पंखे दिले. इंडोपंप कंपनीचे संचालक नानासाहेब ठाकरे यांनी ग्रामपंचायतीला ५१ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्यातून शाळेसाठी दोन स्मार्ट टीव्ही देण्यात आले. कार्यक्रमास सरपंच सुभाष नेहरे, उपसरपंच हर्षल काठे, ग्रामपंचायत अधिकारी नानाभाऊ खांडेकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक राजेंद्र उगले यांनी केले. आभार गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण यांनी मानले.

नामदेव चव्हाण यांना राजाराम निकम पुरस्कार

आयटकचे राज्य उपाध्यक्ष व भाकपचे प्रा. डॉ. राम बाहेती यांची उपस्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : नाशिक जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघ (संलग्न आयटक) यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा कॉ. राजाराम निकम स्मृती पुरस्कार यावर्षी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस आणि कामगार नेते नामदेव चव्हाण (बीड) यांना प्रदान करण्यात आला. आयटकचे राज्य उपाध्यक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय परिषद सदस्य प्रा. डॉ. राम बाहेती यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

येथील ग्रामसेवक युनियन सभागृहात महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे मानद अध्यक्ष कैलास वाघचौरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानपत्र, रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. नामदेव चव्हाण यांचा पत्नी आशाताई चव्हाण यांच्यासह सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघाचे अध्यक्ष व राज्य महासंघाचे संघटन सचिव सखाराम दुर्गुडे यांनी केले. स्वागत जिल्हा सचिव उज्वल गांगुर्डे यांनी केले. प्रा. डॉ. बाहेती यांनी, सत्ताधारी वर्गाच्या कामगारविरोधी धोरणांवर टीका केली. इंग्रज राजवटीपासून कामगार वर्गाने संघर्ष करून अनेक हक्क मिळवले, मात्र मागील ११ वर्षांपासून केंद्रातील सरकारने चार कामगार संहिता लागू करून कामगारांचे अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अशा परिस्थितीत आयटकच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत कर्मचारी जो लढा उभारत आहेत, त्याचे नेतृत्व करणाऱ्या नामदेव चव्हाण यांना राजाराम निकम पुरस्कार देण्याचा मान मिळाला याचा विशेष आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना चव्हाण यांनी, निकम पुरस्कारासारखा सन्मान माझ्यासारख्या कार्यकर्त्याला मिळणे ही जबाबदारी अधिक वाढवणारी बाब आहे. ग्रामपंचायत कर्मचारी व कामगार वर्गाचा लढा पुढे नेण्यासाठी नाशिक जिल्ह्याने मला नवी ऊर्जा दिली आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास आयटकचे राज्य सचिव राजू देसले, राज्य महासंघाचे कार्याध्यक्ष मिलिंद गणवी यांसह इतर उपस्थित होते.

कोटक महिन्द्रा प्राइम लिमिटेड (kotak)
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१.
शाखा कार्यालय : युनिट नं. २०१ २०२, दुसरा मजला, पार्ट सम्राट क्युबिझम, गंगापूर रोड, आनंदवली, नाशिक-४२२ ००५.

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत नोटीस

कोटक महिन्द्रा प्राइम लिमिटेडचे, इंडियन कंपनीज ॲक्ट, १९६५ अंतर्गत एक नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी, तिचे नोंदणीकृत कार्यालय येथे असलेले- २७ बीकेसी, सी२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ (यापुढे ''केएमपीएल'' म्हणून संदर्भित), सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अंतर्गत नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांद्वारा तुमच्याकरिता खालील सूचना निर्गमित करीत आहेत :

ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकार : १. मेसर्स आनंद ट्रेडर्स, त्याच्या मालकाद्वारा : श्री. कमलेश आनंद तोलानी (ऋणको) असलेला पत्ता : प्लॉट नं. २२, हरि ओम निवास, जय भवानी रोड, तुळजा भवानी मंदिराजवळ, जाचक माळा, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **येथेसुद्धा :** फ्लॅट नं. ०१, लक्ष्मी गंगा अपार्टमेन्ट, आनंद नगर, कुलकर्णी मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहर कॉलनी, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **२. श्री. कमलेश आनंद तोलानी (सह-ऋणको/ गहाणकार) असलेला पत्ता :** प्लॉट नं. २२, हरि ओम निवास, जय भवानी रोड, तुळजा भवानी मंदिराजवळ, जाचक माळा, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **येथेसुद्धा :** फ्लॅट नं. ०१, लक्ष्मी गंगा अपार्टमेन्ट, आनंद नगर, कुलकर्णी मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहर कॉलनी, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **३. श्री. योगेश जयकुमार तोलानी (सह-ऋणको/ गहाणकार) असलेला पत्ता :** प्लॉट नं. २२, हरि ओम निवास, जय भवानी रोड, तुळजा भवानी मंदिराजवळ, जाचक माळा, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **येथेसुद्धा :** फ्लॅट नं. ०१, लक्ष्मी गंगा अपार्टमेन्ट, आनंद नगर, कुलकर्णी मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहर कॉलनी, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **४. श्रीमती तमन्ना कमलेश तोलानी (सह-ऋणको) असलेला पत्ता :** प्लॉट नं. २२, हरि ओम निवास, जय भवानी रोड, तुळजा भवानी मंदिराजवळ, जाचक माळा, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१. **येथेसुद्धा :** फ्लॅट नं. ०१, लक्ष्मी गंगा अपार्टमेन्ट, आनंद नगर, कुलकर्णी मंगल कार्यालयाजवळ, गुलमोहर कॉलनी, नाशिक रोड, नाशिक-४२२ १०१.

लोन अका. नं. : KLAP9102

सूचना १३(२)ची तारीख : १८.१२.२०२५, **एनपीए तारीख :** ०३.११.२०२५

ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना तारीख व रक्कम : ३०,१२,२१०.५३ (रुपये तीस लाख बारा हजार दोनशे दहा व पैसे त्रेपन्न फक्त)

गहाणवट मालमत्ता : पुढील बिगर-कृषी जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- जमीन धारण केलेला सर्व्हे नं. ३३/२+३+४ए+६, प्लॉट नं. २५, एरिया मोजमापाचा ३४०.९४ चौ.मी., त्यावर बांधकाम केलेले आणि ''लक्ष्मी गंगा अपार्टमेन्ट'' म्हणून ज्ञात असलेली, उक्त बिल्डिंगपैकी, ‘फ्लॅट नं. १’, तळमजल्यवरील, तिचा बिल्ट-अप एरिया मोजमापाचा ९८.०४ चौ.मी. म्हणजेच १०५५.०० चौ.फू. व उक्त मालमत्ता येथे स्थित- व्हिलेज देवळाली-१, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत आणि नोंदणी व उप-नोंदणी नाशिकच्या मर्यादेतसुद्धा, ता. व जि. नाशिक आणि पुढीलप्रमाणे सीमित : पूर्वेच्या दिशेने- पार्किंग, पश्चिमेच्या दिशेने- ओपन स्पेस, दक्षिणेच्या दिशेने- ओपन स्पेस, उत्तरेच्या दिशेने- ओपन स्पेस व स्टेअरकेस.

मूल्यांकनाकरिता तरतूद केलेल्या कागदपत्राच्या प्रतीनुसार विषयाधीन मालमत्ता ओळखली जाते.

दिनांक : ३१.१२.२०२५ **कोटक महिन्द्रा प्राइम लिमिटेडकरिता**
स्थळ : नाशिक **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**

TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK
प्रादेशिक वसुली कार्यालय : शॉप नं. १-२, केशर प्लाझा, डीजीपी नगर, माऊली लॉन्स् जवळ, अंबड, नाशिक-४२२०१०.
फोन : ०२५३-२३७४३५१/८६९१०६८९३७

शुध्दीपत्रक

मेसर्स सायटेक लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेडच्या दि. १५.०१.२०२६ रोजी निश्चित झालेला लिलाव ज्यासंबंधीची सूचना दि. २६/१२/२०२५ रोजीच्या इंडियन एक्सप्रेस आणि लोकसत्ता मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर लिलाव निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या महानगरपालिका निवडणुकीमुळे पुढे ढकलण्यात आला आहे. नवीन लिलाव सूचना लवकरच प्रसिद्ध केली जाईल. **प्राधिकृत अधिकारी,**
दिनांक : ३१/१२/२०२५ **सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत**
ठिकाण : नाशिक **टीजेएसबी सहकारी बँक लि. साठी आणि त्यांच्या वतीने**

निडो होम फायनान्स लिमिटेड (nido HOME FINANCE)
(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली) (निडो),
नोंदणीकृत कार्यालय येथे स्थित: टॉवर ३, ५वा मजला, विंग ''बी'', कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई- ४०००७०. प्रादेशिक कार्यालयाचा पत्ता: ऑफिस नं. २०८-२१०, दुसरा मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७८, गणेशखिंड रोड, भाम्बुर्डे, शिवाजीनगर, पुणे- ४११०१६, महाराष्ट्र

सरफेसी ॲक्ट, २००२ च्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, खालील ऋणकोंनी **निडो होम फायनान्स लिमिटेडकडून (यापुढे ''निडो'' म्हणून संदर्भित) (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)** त्यांच्याद्वारा प्राप्त केलेल्या कर्ज सुविधांची मुद्दल व व्याज या रकमेची परतफेड करण्यात कसूर दाखविली आहे आणि उक्त कर्जाचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स (एनपीए) म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. मागणी सूचना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (सरफेसी ॲक्ट)च्या सेक्शन १३(२) अंतर्गत त्यांना निर्गमित करण्यात आली होती. उक्त मागणी सूचनेअतिरिक्त या जाहीर सूचनेद्वारा त्यांना कळविण्यात आले आहे.
ऋणको, प्रतिभूती, थकित देणी, मागणी सूचना इ. तपशील सेक्शन १३(२) अंतर्गत पाठविला आहे आणि त्याखालील दावा केलेली रक्कम याखाली दिल्यानुसार आहे :

१. ऋणको, सह-ऋणको, हमीदाराचे नाव व पत्ता आणि कर्ज रक्कम :
शाहिन मोहम्मद झकीर रंग्रेझ (ऋणको) व शादाब शहाबुद्दीन सय्येद (सह-ऋणको)
निवासी पत्ता : फ्लॅट नं. जी४-३०२, तिसरा मजला, सम्राट अपना घर, सोमेश्वर सातपूर लिंक रोड, सिरिन मिडोजच्या मागे, नाशिक- ४२२००७.
कर्ज खाते क्र. : L0870STHL000005337917 **कर्ज करारनाम्याची तारीख : २८.०२.२०२५**
कर्ज रक्कम : रु. ३०,००,०००.००/- (रुपये तीस लाख फक्त) **एनपीए तारीख :** ०४.११.२०२५
मागणी सूचना तारीख : ११.११.२०२५. **देय रक्कम :** रु. ३१,३१,८२४.४७/- (रुपये एकतीस लाख एकतीस हजार आठशे चोवीस व पैसे सत्तेचाळीस फक्त) मागणी सूचना तारीख ११.११.२०२५ पासून पुढील व्याजासह

मालमत्तेची अनुसूची : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. एच-१-७०२, एरिआ सुमारे मोजमापाचा ३९.७६ चौ.मी., कार्पेट अधिक बाल्कनी एरिआ सुमारे मोजमापाचा ६.७२ चौ.मी., लगतच्या टेरेस कार्पेटसह, सातव्या मजल्यावरील, विंग ''एच-१'' मधील, बिल्डिंग ''एच'' व असलेला पार्किंग नं. सीपी-४२६, ''सम्राट अपना घर फेज- २'' म्हणून ज्ञात असलेल्या योजनेतील, जमीन सुमारे मोजमापाचा एरिआ ४१३६.२० चौ.मी. यावर बांधकाम केलेले (एरिआ मोजमापाचा ९६३.७० चौ.मी., एनएमसीकडे हस्तांतरित केलेला वजात करून), गॅट नं. ४८/२ए एरिआ ५१००.०० चौ.मी. यापैकी आणि जमीन एरिआ मोजमापाचा २३२२६.४१ चौ.मी. (एरिआ मोजमापाचा १२७३.५९ चौ.मी., एनएमसीकडे हस्तांतरित केलेला वजात करून), गॅट नं. ५०/२ए एरिआ २४५००.०० चौ.मी. यापैकी, असलेला सिटी सर्व्हे नं. २३८३/१, एरिआ मोजमापाचा २४८४९.०० चौ.मी. व येथे स्थित- व्हिलेज गंगापूर, ता. व जि. नाशिक, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत.

तुम्हा वरील ऋणकोंना त्यामुळे या सूचनेच्या ६० दिवसांच्या आत यावर नमूद केल्यानुसार संपूर्ण थकित देणींचे प्रदान करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास निम्नस्वाक्षरीकारास वर नमूद केलेल्या प्रतिभूतीवर अंमलबजावणी करण्याकरिता सरफेसी ॲक्टअंतर्गत कारवाई करण्यास भाग पडेल. कृपया नोंद घ्यावी की, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३) नुसार तुम्हास आमच्या संमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यखेरीज वरील संदर्भित प्रतिभूतीच्या हस्तांतरणापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे.

स्थळ : नाशिक **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी**
तारीख : ३१.१२.२०२५ **निडो होम फायनान्स लिमिटेडकरिता (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए - ई-लिलाव - स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतूदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना
नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखा कार्यालय नाशिक : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लॅण्डमार्क, तनिष्क शोरूमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, गंजमाळ कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक- ४२२००२.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. ''डी'' मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. ''सी''मध्ये वर्णिल्यानुसार) मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. ''ए'' मध्ये दर्शविल्यानुसार, जसे आणि लागू असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
NHL/NSK/0219/650098 & HOU/NSK/0119/630649 / प्रसाद राजेंद्र सूर्यवंशी/शितल राजेंद्र अहेर/ शाखा कार्यालय: नाशिक	रु. १७,५१,२३३.१७ व १४.०८.२०२४	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट नं. ६, तिसरा मजला, सर्व्हे नं. १२३ एर २बी १ ते ३, साई दर्शन अपार्टमेंट, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, निगल पार्कच्या मागे, शिवाजीनगर, नाशिक, गंगापूर शिवार, नाशिक- ४२२०१२, महाराष्ट्र, भारत	रु. १५,७४,०००/-	रु. १,५७,४००/-	३०.०१.२०२६	रु. १०,०००/-	१४.०१.२०२६ रोजी दु. १२.०० व दु. ४.०० दरम्यान	३१.०१.२०२६ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान	ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत नियमाने लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ. सह एकत्रित. ** ''पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड''च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. ''के'' मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. ... (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वर्णित स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वाटाघाट लावणे यापासून ''पीएनबीएचएफएल''ला/ ''पीएनबीएचएफएल''च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि सद्य स्थिती रकाना नं. ''के'' मध्ये नमूद केलेली आहे. (२.) भावी खरेदीदार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. ''के'' मध्ये नमूद केलेल्या व मंजूर केलेल्या प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. ... (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार/ खरेदीदाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, ... विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतर केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. ... (४.) मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकाऱ्यास सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट- www.bankeauctions.com ... फ्रि नं.: १८०० १२० ८८०० व ई-मेल: auction@pnbhousing.com, ... www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.

स्थळ : नाशिक, दिनांक : ३१.१२.२०२५ स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड